**पुणे येथील कृषि भवन इमारत आणि आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकामासाठी आवश्यक असलेली तरतूद ठेव अंशदान स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्र.कृषिआ- २०२६/प्र.क्र. २६ /(ई- ऑफिस क्र. १६०००८०) १६-अे.**

**मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई-३२.**

**दिनांक : २० मार्च, २०२६**

**संदर्भ : १) कृषि व पदुम विभाग शासन ज्ञापन क्र. कृषिआ-२८२१/प्र.क्र.२५०/१६-अे, दि. १३.१२.२०२१**

**२) संचालक (डिजीटल), केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण विभाग यांचे पत्र क्र. No. Z-११०२१ /७/ २०२५-Digital Agriculture-Part (४) FTS No. १८३२३०, दि.२६.०२.२०२६.**

**प्रस्तावना :**

विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजना २०२५-२६ अंतर्गत ॲग्रिस्टॅक योजनेशी संलग्न शेतकरी संच निर्मिती यासंदर्भात उक्त योजनेंतर्गत ३ रा व ४ था टप्पा पूर्ण झाल्याने, राज्यास ८९३.४० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनाच्या व्यय विभागास प्रस्ताव सादर करण्यात आले असल्याचे संचालक (डिजीटल), केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण विभाग यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. विशेष अर्थसहाय्य योजनेसाठी विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश आहे. त्यासंदर्भातील वित्त विभागामार्फत मान्यता प्राप्त प्रकल्पाच्या यादीमध्ये पुणे येथील कृषि भवन इमारत आणि आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकामाचे समावेश आहे. केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त कर्जाच्या अनुषंगाने मागणी क्र डी-३ लेखाशीर्ष २४१५००७२ अंतर्गत रु.१९७.६३४८ कोटी व लेखाशीर्ष २४१५०१०५ अंतर्गत रु.६४.७७२३ कोटी अशी एकूण रु.२६२.४०७१ कोटी इतक्या रकमेची तरतूद पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आली होती. त्यापैकी उक्त लेखाशीर्षांतर्गत भांडवली खर्चासाठी प्राप्त झालेल्या रु.२५२.२२ कोटी इतक्या निधीपैकी पुणे येथील कृषि भवन इमारत व आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकाम करण्यासाठी रु.१०३.८६ कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव अंशदान स्वरुपात वर्ग करण्यास वित्त विभागाकडून मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुणे येथील कृषि भवन इमारत व आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकाम करण्यासाठी मागणी क्र. डी-३ अंतर्गत (००) (०९) महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५००७२), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत रु.२०.०० कोटी व ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान अंतर्गत ७९.७७४८ कोटी अशी या लेखाशिर्षामधून

रु.९९.७७४८ कोटी व मागणी क्र. डी-३ अंतर्गत (००) (०९) वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५०१०५) , ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत रु.४.०८५२ कोटी असा एकूण रु.१०३.८६ कोटी इतका निधी भाग-१ महसूल व जमा यांचे तपशिलवार अर्थसंकल्पिय अंदाज मधील (बी) बिनव्याजी ठेवी, ८४४३ नागरी ठेवी, "**११७, सार्वजनिक संस्था किंवा खाजगी व्यक्तीसाठी केलेल्या कामाकरिता ठेवी, (००) (००) (०१) सार्वजनिक संस्था किंवा खाजगी व्यक्ती यांच्याकरिता केलेल्या कामाकरिता ठेवी (८४४३ ५२२५)**" या लेखाशिर्षाखाली ठेव अंशादान स्वरुपात वर्ग करण्याची बाब शासनाची विचाराधिन आहे. याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

पुणे येथील कृषि भवन इमारत आणि आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकाम करणेकरिता शासन निर्णय दि.१३.१२.२०२१ अन्वये रु. २४९.६९९३ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

२. संचालक (डिजीटल), केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण विभाग यांच्या दि.२६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजना (SASCI) २०२५-२६ साठी योजनेच्या भाग-१ अतिरिक्त वाटप अंतर्गत विशेष सहाय्य (कर्ज) मंजूर करण्यात आले आहे. केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त कर्जाच्या अनुषंगाने वित्त विभागाने सदरहू रु.२५२.२२ कोटी इतकी तरतूद कृषि विभागाकडील मागणी क्र. डी-३ लेखाशीर्ष २४१५००७२ अंतर्गत रु.१९७.६३४८ कोटी व लेखाशीर्ष २४१५०१०५ अंतर्गत वितरीत केली आहे. सदर तरतूदीपैकी पुणे येथील कृषि भवन इमारत व आयुक्त, कृषि यांचे निवासस्थान बांधकाम करण्यासाठी मागणी क्र. डी-३ अंतर्गत (००) (०९) महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५००७२), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत रु.२०.०० कोटी व ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान अंतर्गत ७९.७७४८ कोटी अशी या लेखाशिर्षामधून रु.९९.७७४८ कोटी व मागणी क्र. डी-३ अंतर्गत (००) (०९) वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५०१०५), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत रु.४.०८५२ कोटी असा एकूण रु.१०३.८६ कोटी इतका निधी भाग-१ महसूल व जमा यांचे तपशिलवार अर्थसंकल्पिय अंदाज मधील (बी) बिनव्याजी ठेवी, ८४४३ नागरी ठेवी, "**११७, सार्वजनिक संस्था किंवा खाजगी व्यक्तीसाठी केलेल्या कामाकरिता ठेवी, (००) (००) (०१) सार्वजनिक संस्था किंवा खाजगी व्यक्ती यांच्याकरिता केलेल्या कामाकरिता ठेवी (८४४३ ५२२५)**" या लेखाशिर्षाखाली ठेव अंशादान स्वरुपात वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. अर्थसंकल्प शाखा (२अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरचा निधी या बांधकामाशी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अंमलबजावणी यंत्रणेचे नियंत्रक अधिकारी म्हणून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मंडळ पुणे (सीओ कोड- H००४३) यांच्याकडे वर्ग करण्यात यावा. अधिक्षक

अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मंडळ पुणे यांनी सदरचा निधी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना वितरीत करावा.

४. सदरचा निधी दि.३१.०३.२०२६ पर्यंत प्राध्यान्याने खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

५. केंद्र शासनाच्या विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजना (SASCI) २०२५-२६ साठी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १४/२०२६/ व्यय-१, दिनांक १०.०३.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र. ३३/२०२६/ अर्थबळ, दिनांक १६.०३.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०३२०१३०५२६५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and ADF Department, 2.5.4.20=8EC4809BF7E642CE22FDACB42A63CA8410ADE167476AC90F3C879FACBF715A09, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4D8A55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2026.03.20 20:32:04 +05'30'

**( अं. सा. चंदनशिवे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक,
३. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (सा. बां. वि.) यांचे स्वीय सहायक, सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. उप सचिव (का.१६अे/२अे) यांचे स्वीय सहायक, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. संचालक (कृषि अभियांत्रिकी), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर,
१०. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर,
११. वित्त विभाग (व्यय- १/अर्थबळ), मंत्रालय मुंबई,
१२. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंडळ पुणे,
१३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे,
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१५. निवडनस्ती, का.१६अे